CS (MAIN) Exam:2016

M–ESC–CU–MRT

# MARATHI

**( Compulsory )**

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 300 |
| --- | --- |

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in MARATHI unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer-book must be clearly struck off.



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

मराठी

( अनिवार्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 300

## प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

**प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा**

सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.

प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.

www.mpscmaterial.com

जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.

प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 600 शब्दांत निबंध लिहा : 100

(a) संस्कृतीचे महत्त्व

(b) 'स्मार्ट' शहरे आणि राबाळ (unsmart) नागरिक

(c) न्यायव्यवस्थेची 'सक्रियता' विरुद्ध न्यायव्यवस्थेतील 'अतिउत्साह' (over-reach)

(d) आपल्या सांस्कृतिक वारशाबद्दल शाळकरी मुलांमध्ये आदर निर्माण करणे

2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे संक्षिप्त सुस्पष्ट आणि बरोबर असावीत :

'स्यित्रांनी अर्धे आकाश व्यापले आहे' असे म्हटले जाते. किंवा त्याहीपेक्षा जास्त असे आपण वादाखातर म्हणू शकतो. असे असले तरी काळाच्या प्रत्येक टप्प्यात, प्रत्येक देशात, संस्कृती नि परंपरेत धर्म, जात, वर्ग, वर्ण आणि मान्यतांमधून आणि आमच्या वैविध्यपूर्ण भूतकाळात व बदललेल्या वर्तमानात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत स्त्री ही मागेच राहिली आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, काम करण्याची मुभा, विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी नेतृत्व, स्वप्न पाहणे नि त्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करणे या राारख्या गोष्टीत त्यांना प्राधान्य दिले जात नाही. निश्चितच, शतकापासून स्त्रिया जगातील सर्वात जास्त अल्पसंख्यांक ठरल्या आहेत.

पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला स्वयंपूर्ण व्यक्ती म्हणून मान्यता मिळाली नाही. त्यांच्याकडे कधीही स्वयंपूर्ण, स्वायत्त किंवा प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून पाहिले जात नाही शिवाय सामाजिक व्यवहार, कायदेकानू किंवा सामाजिक संस्थांमधून समानतेची वागणूक दिली जात नाही. त्यांच्याकडे फक्त पुरूषाचे साधन म्हणजे प्रजोत्पादन, संगोपन, कामतृप्ती आणि कुटुंबांचे संगोपन करणारी व्यक्ती म्हणून पाहिले जाते. सांस्कृतिक पातळी वर ही त्यांना मुलगी, पत्नी, आई या नात्यानेच मान्यता दिली जाते. नाहीतर त्यांच्याकडे पतित म्हणून पाहिले जाते.



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

एकटी राहणारी स्त्री तर या पुरूषसापेक्ष वर्तुळाच्या बाहेरेच आहे. लग्नाचे वय झालेले असून ही ज्यांनी लग्न केले नाही किंवा ज्या विधवा आहेत, घटस्फोटित आहेत अगर स्वतंत्र राहत आहेत. अशा स्त्रियांचे पुरूषाधीन नसणे हे समाज स्वीकार करीत नाही. एवढेच नाही तर एखाद्या स्त्रीचा नवरा अपघातात किंवा आजाराने दगावला असेल तरी तिच्या स्वतंत्र जगण्याला समाज स्वीकार करीत नाही. कोणत्याही परिस्थितीत पुरूषाधीन नसलेल्या स्त्री बद्दल पुरूषांच्या मनात राग असतोच.

विकसनशील राष्ट्रांमध्ये 60 ते 80 टक्के स्वयंपाक स्त्रियाच करतात आणि जगातील अर्ध्या अन्न-धान्यावर त्यांचा अधिकार आहे परंपरेने घराघरातील स्वयंपाकाची जबाबदारीही त्यांच्यावरच आहे. असे असले तरी भारतात स्त्रिया कमी आणि शेवटी जेवतात आणि पुरेसे अन्न नसल्यास उपाशीही राहतात. काही वेळा घरात समानतेची वागणूक मिळत नसल्यामुळे पुरेसे अन्न असून ही तिला रुवे तितके खायला मिळत नाही. जगाला स्वतंत्रपणे सामोरे जाणाऱ्या एकट्या स्त्रीला तर सामाजिक पातळीवर पोट भरण्यासाठी किंवा जगण्यासाठी अनेक अडथळे पार करावे लागतात.

मुलांच्या/पुरुषांच्या तुलनेत मुलींची/स्त्रियांची संख्या कमी असलेल्या जगातील मोजक्याच देशांत भारताची गणना होते. लोकसंख्येत त्यांचे प्रमाण मागील एक शतकात कमी झाले आहे. इ०स० 2001 च्या लोकसंख्येप्रमाणे 1000 पुरुषांच्या सरासरीत स्त्रियांची संख्या फक्त 933 इतकी होती. मुलींना आरोग्य, आहार आणि जगण्याची मुलांसारखीच संधी देण्यात आली तर लोकसंख्येत त्यांचे प्रमाण पुरुषांइतकेच होईल. उलट 2001 साली मुलांच्या/पुरुषांच्या तुलनेत मुलींची/स्त्रियांची संख्या 3 कोटी 50 लाखाने कमी होती. इ.स. 2011 च्या लोकसंख्येत सरासरीत किंचित वाढ झाली. 933 च्या ऐवजी मुलींचे प्रमाण 940 इतके झाले. काळजीचे मुख्य कारण 1 ते 6 वर्षे या वयोगटात मुलींचे घसरते प्रमाण हे आहे. इ०स० 2001 साली हे प्रमाण 927 होते ते 2011 साली 914 इतके खाली आले. या आकडेवारीतून हेच सिद्ध होते की सामाजिक-सांस्कृतिक आणि वाढत्या तंत्रज्ञानाच्या पातळीवर भेदाभेद केल्यामुळे मोठ्या प्रमाणात मुलींना/स्त्रियांना



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

जगण्यापासून परावृत्त केले गेले. कदाचित हे प्रमाण भारतात नियमितपणे मुलींचा/स्त्रियांचा होणाऱ्या मृत्यूपेक्षा जास्त आहे.

(a) मुलींच्या/स्त्रियांच्या बाबतीत लोकसंख्येची आकडेवारी आपल्याला काय सुचविते? 12

(b) अन्न आणि स्त्रिया यांच्या संबंधातील असमतोलामध्ये कोणता उपरोध आहे? 12

(c) 'स्त्रिया अर्ध्याहून अधिक आकाश व्यापून राहिल्या आहेत' हे विवाद्य आहे, असे लेखकास का वाटते? 12

(d) पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांकडे कोणत्या भूमिकेतून पाहिले जाते? 12

(e) एकट्या स्त्रीचे अस्तित्व लेखकाला कोणत्या कारणास्तव असुरक्षित वाटते? 12

**3.** पुढील उताऱ्याचा अंदाजे एक तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला कृपया शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा : 60

एकनिष्ठ असणे हे कौतुकास्पद आहे यावर आपल्यापैकी बहुतेक जण सहमत होतील. आपण आपल्या कुटुंबावरील निष्ठा, आपल्या मित्रांबाबतची निष्ठा, आणि आपल्या देशाविषयीची निष्ठा स्तुत्य मानतो. किंबहुना ज्यांच्या बद्दल आपण कृतज्ञ असायला हवे त्या सर्व व्यक्ती विषयीची व गटांविषयीची निष्ठा. आणि जेव्हा आपण इथे 'निष्ठा' असे म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ असतो जेव्हा ते संकटात किंवा धोक्यात असतील तेव्हा त्यांना मदत करण्याची 'तत्परता' आणि त्यांच्या कल्याणाविषयी सदा सर्वकाळ चिंता. जेव्हा एखादी व्यक्ती निष्ठाहीन होते तेव्हा त्याचा अर्थ स्पष्ट असतो—उदाहरणार्थ, जेव्हा ती बेफिकीर राहून आईवडिलांना कष्ट भोगू देते, किंवा जेव्हा ती आपल्या स्वतःच्या देशाविरुद्ध युद्‌ध करणाऱ्या एखाद्या सैन्याला जाऊन मिळते आणि आपल्या देशबांधवांची बेधुंदपणे हत्या करते. अशा लोकांच्या बाबतीत आपल्यापैकी बहुतेकजण नाखूष असतात.



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

तथापि, बऱ्याच वेळा अशी परिस्थिती निर्माण होते की एखादी व्यक्ती निष्ठाहीन आहे अथवा नाही हे ठरविणे कठीण होऊन बसते. एखादे हुषार मूल आपल्या आईवडिलानी अभ्यास थांबवून त्यांना आर्थिक साह्य करण्यासाठी नोकरी करायला प्रारंभ करण्याचे केलेले आवाहन न ऐकता त्याला विरोध करू शकते. त्याला असे वाटू शकते की जर त्याने अभ्यास चालू ठेवला तर तो भविष्यात त्यांना अधिक समग्रपणे मदत करू शकेल, आणि उलट आत्ताच अभ्यास सोडून दिला तर तो कुणालाच कधीच मदत करू शकणार नाही, त्याची हुशारी वाया जाईल. अशा तऱ्हेचा निर्णय घेतल्याबद्दल एखाद्या मुलाची वा मुलीची कल्पनाशून्य लोक निंदा करतील; पण बऱ्याच वेळा असे मूल जर विवेकी आणि संवेदनाक्षम असेल तर त्याला मदतीची व प्रोत्साहनाची गरज असते, निंदेची नव्हे. याउलट, काही विशिष्ट परिस्थितीत—उदाहरणार्थ, त्या मुलाचे आईवडील अत्यंत गरिबीत खितपत असतीत तर—त्याच्या दृष्टीने कामाला बाहेर पडून त्यांना मदत करण्यास नकार देणे हे निष्ठाहीनतेचे लक्षण ठरू शकते, आणि जरी तो आयुष्यात पुढे यशस्वी झाला तरी लहानपणी आपण निष्ठाहीन ठरलो याचा त्याला पश्चात्ताप वाटत राहील.

www.mpscmaterial.com

कधीकधी यापेक्षाही कठीण प्रश्न एखाद्या माणसाच्या आपल्या देशाच्या शासनाशी असलेल्या संबंधाबाबत उद्‌भवतो. आपल्या देशावर प्रामाणिकपणे प्रेम करणाऱ्या लोकांचा एखादा गट देशाच्या समृद्धीविषयी आणि सुखाविषयी काळजी वाटल्यामुळे शासनाविरुद्ध बंड करू शकतो, कदाचित सशस्त्र बंड ही, कारण त्यांचा असा विश्वास असतो की हे सरकार वाईट आहे, देशाला अपायकारक आहे, आणि दुसऱ्या कोणत्याही उपायाने ते उलथून टाकता येणार नाही. सरकारकडून त्यांना ताबडतोब 'बंडखोर' किंवा 'विश्वासघातकी' असे नामाभिधान मिळेल आणि यांपैकी पहिला शब्द जरी काटकोरपणे बरोबर असला तरी दुसरा तसा मुळीच असणार नाही. कारण ते आपल्या देशाच्या भल्याची सरकारपेक्षाही जास्त चिंता करणारे असू शकतील. दुर्दैवाने, एखादे बंड हे देशाविषयीच्या निष्ठेतून 'प्रेरित' झालेले आहे की स्वार्थी हेतूने, हे जाणणे ते बंड यशस्वी झाल्याशिवाय शक्य होत नाही. तेव्हा असा प्रश्न येईल की आता जर हे बंडखोर यशस्वी झालेले आहेत आणि त्यांनी आपले



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

सरकार बनवलेले आहे, तर ते हे मान्य करतात का, देशाची समग्र लोकसंख्या, मग त्यात त्यांचे राजकीय शत्रू देखील आले, काही किमान हक्क धारण करते, उदाहरणार्थ आपले मत मुक्तपणे व्यक्त करणे, आणि लोकप्रिय जनाधार प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे? की आपल्या राजकीय शत्रूंना नष्ठ करण्यासाठी ते आपल्या सत्तेचा वापर करीत आहेत? जर ते पूर्वोक्त गोष्ट करत असतील, तर आपल्याला कळेल की ते देशाशी निष्ठावान आहेत आणि केवळ आपल्या गटाच्या स्वार्थासाठी धडपडणारे नाहीत. परंतु जर ते उत्तरोक्त गोष्ट करत असतील, तर आपल्याला कळेल की ज्यांचे सरकार त्यांनी उलथून टाकले होते त्याच्यापेक्षा काही ते निष्ठावान नाहीत. मात्र तोपर्यंत आपल्याला हे कळायला फार उशीर झालेला असेल.

**4.** पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : 20

एक 'अमीर' जहाजातून समुद्रप्रवास करीत असताना त्यांना वादळाने घेरले. त्याच्या सोबत प्रवास करीत असलेल्या गुलामांपैकी पहिल्यांदाच प्रवास करीत असलेला गुलाम भीतीने ओरडू-रडू लागला. त्याचे रडणे बराच वेळ सुरू होते. आणि कुणालाही त्याला शांत करता आले नाही. अमीर खवळला आणि संतप्त सुरात म्हणाला, कमाल आहे; या करंट्या, घाबरट माणसाला कोणी ही शांत करूत शकत नाही?

जहाजात एक तत्त्वज्ञही प्रवास करीत होता. तो म्हणाला, "मला वाटते जर तुम्ही मला पूर्ण स्वातंत्र्य आणि परवानगी दिली तर मी या माणसाला शांत करू शकतो." "माझी 'परवानगी आहे'; तुम्ही तसे करा" अमीर म्हणाला.

तत्वज्ञाने काही खलाशांना बोलावून त्या माणसाला समूद्रात फेकून देण्याचा आदेश दिला. त्यांनी तसेच केले. बिचारा गुलाम भीतीने किंचाळू लागला आणि पाण्यात वेडे वाकडे हात-पाय आपटू लागला. मात्र क्षणमात्रातच तत्त्वज्ञाने खलाश्यांना त्याचा हात धरून जहाजावर घेण्यास सांगितले. वर आल्यावर गुलाम अत्यंत दमला आणि घाबरला होता. परंतु अगदी शांत होता. गुलामाच्या वागणुकीत झालेला ह्या बदल



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

पाहून अमीरला नवल वाटले. त्याने यामागचे काय कारण आहे? असे तत्त्वज्ञाला विचारले. तंत्त्वरा म्हणाला, "आहे त्यापेक्षा वाईट परिस्थितीत सापडल्या शिवाय आपल्याला परिस्थितीचे खरे आकलन होत नसते."

**5.** पुढील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

Man has always been fascinated by dreams. He has always tried to find explanations for his dreams. Perhaps dreams tell us about the future or the past, perhaps they tell us about our deepest fears and hopes. I don't know. Today, I want to give you a completely different explanation. But before I do so, I must give you one or two facts about dreams. First of all, everybody dreams. You often hear people say, 'I never dream', when they mean, 'I can never remember my dreams'. When we dream, our eyes move rapidly in our sleep as if we were watching a moving picture, following it with our eyes. This movement is called REM, that is Rapid Eye Movement. REM sleep is the sleep that matters. Experiments have proved that if we wake people throughout the night during REM, they will feel exhausted the next day. But they won't feel tired at all if we take them at times when they are not dreaming. So the lesson is clear : it is dreaming that really refreshes us, not just sleep. We always dream more if we have had to do without sleep for any length of time.

If that is the case, how can we explain it? I think the best parallel I can draw is with computers. After all, a computer is a very primitive sort of brain. To make a



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

computer work, we give it a programme. When it is working, we can say it is 'awake'. If ever we want to change the programme, that is to change the information we put into the computer, what do we do? Well, we have to stop the computer and put in a new programme or change the old programme.

**6.** *(a)* पुढील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा : 2×5=10

*(i)* दैव रुसणे

*(ii)* आकाश पाताळ एक करणे

*(iii)* पदरमोड करणे

*(iv)* आकाशाला गवसणी घालणे

*(v)* दात कोरून पोट भरणे

*(b)* खाली दिलेल्या कल्पनांचा प्रत्येकी *10* वाक्यांत विस्तार करा : 5×2=10

*(i)* जनसेवा हीच ईश्वर सेवा

*(ii)* विद्या विनयेन शोभते

*(c)* पुढील विषयावर *20* वाक्यांचा संवाद लिहा : 10

नेत्रदान—श्रेष्ठ दान



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

(*d*) खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1×10=10

(*i*) मार्ग

(*ii*) महिमा

(*iii*) वंदन

(*iv*) वीज

(*v*) स्वच्छ

(*vi*) निपुण

(*vii*) वसुधा

(*viii*) उणीव

(*ix*) अंबर

(*x*) सरिता

www.mpscmaterial.com

★★★



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial